# मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामाला गती मिळणार
# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते केला शुभारंभ

■ मुंबई



**कुलाबा-** वांद्रे-सिप्झ या भूमिगत मेट्रो-३ प्रकल्पाला गती देण्यासाठी मुंबई मेट्रो कॉर्पोरेशनने आज आणखी एक पाऊल पुढे टाकले. बोगदा खणण्यासाठी आणलेली टनेल बोरिंग मशिन बोगद्यासाठी खोदण्यात आलेल्या विहिरीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोडण्यात आली.

मेट्रोच्या भूमिगत मार्गाच्या खोदकामासाठी दोन अजस्त्र मशीन चीनमधून आणल्या आहेत. मुंबई बंदरातून या दोन मशीन नया नगर, माहीम येथील प्रकल्पस्थळी दाखल झाल्या आहेत. ही मशीन मोठी असल्याने ती सुट्या भागांच्या स्वरुपात आणली आहे. भूमिगत मार्गाचा बोगदा खणण्यासाठी प्रकल्पाच्या मार्गात ठिकठिकाणी मोठ्या विहिरी खणण्यात आल्या आहेत. या विहिरींमध्ये ही मशीन सोडल्यानंतर खोदकाम सुरू होणार आहे.

आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या मशीनचे सुट्टे भाग विहिरीत सोडण्यात आले. आता पुढील ४० ते ४५ दिवसांत या सुट्ट्या भागांची आत जुळवणी होईल आणि मशीनने बोगदा तयार केला जाईल, अशी आणखी १५ मशीन्स टप्प्याटप्प्याने आणली जाणार आहेत.